स्था.१८/ब/ अहवाल शाखा /वलेप अहवाल/न.क्र.८२/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०१/२०१८, दिनांक - २२/०२/२०१८**

विषय:- जिल्हा परिषदांच्या वार्षिक लेखे तपासणीबाबत.
वाचा :- संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ५९, दि. ०५.१०.१९९५

**प्रस्तावना:-**

संचालनालयस्तरीय आढावा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदचे वार्षिक लेखे तपासणे संदर्भात कामकाज करीता जिल्हास्तरीय स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय स्तरावर लेखे प्रदिर्घ कालावधीसाठी प्रलंबित राहतात.

उपरोक्त पुनरावृत्ती टाळण्यास्तव जिल्हा परिषदांचे वार्षिक लेखे तपासणे व प्रमाणित करणे या संदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश:-**

जिल्हा परिषदांचे अनुषंगाने वार्षिक लेखे तपासणी करणाची कार्यपध्दती व कार्यकक्षा खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

१. जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाचे लेखापरीक्षणाकरीता पथक प्रमुख सहाय्यक संचालक आहेत. यास्तव वार्षिक लेखे तपासण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक यांचेवर सोपविण्यात येत आहे. सदर कामकाजास्तव सहाय्यक संचालक यांनी त्यांचे कार्यालयातील दोन कनिष्ठ लेखापरीक्षक अथवा वरीष्ठ लेखापरीक्षक यांचे मदतीने पूर्ण करावे.

२. जिल्हा स्तरीय स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने जिल्हा परिषदेकडून तपासणी करीता लेखे प्राप्त झाल्यापासुन सदर बाबत नियमोचित कार्यवाही दहा कामकाजाचे दिवसात पुर्ण होईल याबाबत दक्षता घ्यावी.

३. सह संचालक स्तरावर प्रमाणिकरणास्तव लेखे प्राप्त झाल्यापासून, सदर बाबत नियमोचित कार्यवाही ५ कामकाजाचे दिवसात पुर्ण होईल याबाबत दक्षता घ्यावी.

४. जिल्हा कार्यालयाकडे / सहसंचालक कार्यालयाकडे लेखे प्राप्त झाल्यानंतर तपासणीअंती काही त्रुटी आढळल्यास त्याच्या पुर्ततेसाठी लेखे जिल्हा परिषदेस १० कामकाजाचे दिवसात परत करावेत.

वरील प्रमाणे वार्षिक लेख्यांची तपासणी व प्रमाणिकरणाबाबतचे आदेश देण्यात येत आहे, तसेच कार्यालयीन आदेश क्र.५९ मधील सूचना अ.क्र. १२ प्रस्तुत आदेशाद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

(प्रताप मोहिते)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D/aa२/wani/ asa /file no १८३/ १०.१०.२०१७